आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

९ मार्च २०२४ -शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची ईशान्य भारत आणि पश्चीम बंगालला भेट - विविध पायाभूत सुविधांची केली पायाभरणी आणि उद्घाटन / देशातल्या गरिबांच्या सर्वांगीण विकासाकरता आपलं सरकार वचनबद्ध असल्याची प्रधानमंत्र्यांची ग्वाही
- भारतातल्या सर्वात वेगवान आणि स्वदेशी मल्टीप्रोटोकॉल लेबल स्विचिंग राऊटरचा केंद्रीय माहिती तंत्रज्ञानमंत्री यांच्या हस्ते प्रारंभ.
- आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत आंध्रप्रदेशात भाजपा, तेलगु देसम आणि जन सेना पार्टीच्या युतीची घोषणा
- धरमशाला इथं झालेल्या पाचव्या कसोटीसह इंग्लंडविरोधातली मालिका भारतानं ४-१ अशी जिंकली / कसोटी क्रिकेटमध्ये ७०० बळी घेणारा जेम्स अँडरसन्स जगातला पहिला वेगवान गोलंदाज

  **आणि**

- मुंबई आणि विदर्भाच्या क्रिकेट संघात रणजी करंडकाची अंतिम लढत उद्यापासून मुंबईत

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आपल्या इशान्य भारताच्या भेटीत मणिपूर, मेघालय, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा आणि अरुणाचल प्रदेशात सुमारे ५५ हजार ६०० कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केलं. यानिमीत्त अरुणाचल प्रदेशात इटानगर इथं झालेल्या कार्यक्रमात त्यांनी सेला बोगदा राष्ट्राला समर्पित केला. उन्नती योजनेमुळे ईशान्येकडील राज्यांच्या

औद्योगिक विकासाला चालना मिळून त्यांचा  आर्थिक विकास व्हायला मदत होईल असं ते म्हणाले.

त्यांनी आज आसामलाही भेट दिली. यावेळी त्यांनी १७ हजार ५००  कोटी रुपयांच्या प्रकल्पांचं उद्घाटन केलं. ईशान्य भारतचा विकास संपूर्ण  भारताच्या विकासासाठी महत्त्वाचा असल्याचं ते जोरहाट इथल्या सभेला संबोधीत करताना म्हणाले.

यानंतर आज संध्याकाळी त्यांनी पश्चिम बंगालमध्ये सिलिगुडीला भेट दिली. तिथं झालेल्या कार्याक्रमात त्यांनी ‘विकसित भारत विकसित पश्चिम बंगाल’ कार्यक्रमात चार हजार पाचशे कोटी रुपयांच्या रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांचं उद्घाटन, पायाभरणी आणि राष्ट्रार्पण केलं. यावेळी त्यांनी जनसभेलाही संबोधीत केलं. देशातल्या गरिबांच्या सर्वांगीण विकासाकरता आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारतातल्या सर्वात वेगवान आणि स्वदेशी विकसित मल्टीप्रोटोकॉल लेबल स्विचिंग राऊटरचा आज केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बेंगळुरू इथे प्रारंभ केला. या राऊटरमुळे भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांना चालना मिळेल तसंच हाय स्पीड डेटा प्रोसेसिंग आणि ट्रान्समिशनच्या मागणीला समर्थन मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

हा अत्याधुनिक राउटर स्वावलंबन आणि तांत्रिक नवकल्पनांच्या दिशेनं वाटचाल करणाऱ्या राष्ट्रासाठी एक महत्त्वाची संधी आहे. भारत आता मोठ्या डिझाईन क्षमतेसह अनेक नावीन्यपूर्ण, हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरसह हाय-टेक उत्पादनाचा पाया रचत आहे, असं लॉँचिंगनंतर बोलताना अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशात बियाणं आणि खतांच्या किमती वाढू नयेत यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करेल असं भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज सांगितलं. छत्तिसगडची राजधानी रायपूर इथं भाजपा किसान मोर्चानं आयोजित केलेल्या किसान महासंमेलनात ते बोलत होते. मोदी सरकारनं सगळी आश्वासनं पूर्ण केली असून २५ कोटी लोकांना दारिद्रय रेषेखालून वर आणल्याचं ते म्हणाले. या कार्यक्रमाला छत्तिसगडचे मुख्यमंत्री विष्णु देव साई उपस्थित होते.

**<><><><><>**

जल व्यवस्थापन आणि जल संवर्धनात देशातल्या महिलांच्या उल्लेखनीय योगदानाचं केंद्रीय जलशक्तीमंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी कौतुक केलं आहे. पावसाच्या पाण्याची बचत आणि संवर्धन करण्यावर लक्ष केंद्रित करणाऱ्या "जल शक्ती अभियान: कॅच द रेन अर्थात पावसाचं पाणी वाचावा" या देशव्यापी अभियानाचा आरंभ आज शेखावत यांच्या हस्ते नवी दिल्लीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. देशातल्या सुमारे एक कोटी महिलांनी देशात सकारात्मक परिवर्तन घडवण्याची जबाबदारी उचलली आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारतीय जनता पक्ष, तेलगू देसम पक्ष आणि जनता सेना पक्षांनी आंध्र प्रदेशात आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र लढवण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपचं तेलगू देसम पक्ष आणि जनता सेना पक्षासोबत एकत्र येण्यानं आंध्र प्रदेशातल्या लोकांच्या आकांक्षा पूर्ण करण्यात मदत होईल, असं भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा, टीडीपीचे अध्यक्ष एन. चंद्राबाबू नायडू आणि जनसेना पक्षाचे पवन

कल्याण यांनी एका संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. एक-दोन दिवसांत जागा वाटपाच्या पद्धतींवर चर्चा केली जाईल, असं निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यसभा निवडणुकीसाठी झारखंडमधून भाजपनं डॉ. प्रदीप वर्मा यांची पक्षाचे उमेदवार म्हणून घोषणा केली आहे. आगामी विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी भाजपनं बिहारमधल्या तीन आणि उत्तर प्रदेशमधल्या सात उमेदवारांची नावही जाहीर केली आहेत.

<><><><><>

बसपा अर्थात बहुजन समाज पार्टी येणाऱ्या निवडणुका स्वबळावर लढवणार असून कोणत्याही पक्षाशी युती करणार नाही असं पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष मायावती यांनी आज पुन्हा एकदा स्पष्ट केलं. निवडणुकांसाठी बसपा युती किंवा तिसरी आघाडी करत असल्याचं वृत्त या पूर्णपणे चुकीचं आणि दिशाभूल करणारं असल्याचं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. बसपा उत्तर प्रदेशात पूर्ण तयारीनं निवडणुकीच्या रिंगणात उतरेल, असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

भारत आणि इंग्लंड यांच्यात धर्मशाला इथं झालेला पाचव्या आणि अखेरच्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं इंग्लंडवर एक डाव आणि ६४ धावांनी विजय मिळवत, मालिकाही ४-१ अशी जिंकली. सामन्याच्या आज तिसऱ्या दिवशी सकाळी भारताचा पहिला डाव ४७७ धावांत आटोपला. त्यानंतर २५९ धावांनी पिछाडीवर पडलेल्या इंग्लंडचा दुसरा डाव केवळ १९५ धावांतच संपुष्टात आला. आर.अश्विन यानं इंग्लंडचे ५ फलंदाज बाद केले, तर इंग्लंडच्या वतीनं जो रुट यानं

सर्वाधिक ८४ धावा केल्या. याच कसोटीत आज सकाळी इंग्लंडच्या जेम्स अँडरसन यानं कुलदीप यादवला बाद करत कसोटी कारकिर्दीतील ७०० बळींचा टप्पा गाठला. कसोटी क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारा तो जगातला पहिला वेगवान, तर मुथैय्या मुरलीधरन आणि शेन वॉर्ननंतरचा केवळ तिसरा गोलंदाज ठरला आहे.

पहिल्या डावात ५ गडी बाद करणाऱ्या कुलदीप यादव याला सामनावीर तर मालिकेत सर्वाधिक धावा करणाऱ्या यशस्वी जयस्वाल याला मालिकाविराच्या पुरस्कारानं गौरवलं गेलं.

या विजयानंतर भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं खेळाडूंना कसोटी सामन्यासाठी मिळणाऱ्या मानधनाव्यतिरिक्त अधिकची रक्कम प्रोत्साहन म्हणून दिली जाईल अशी घोषणा केली आहे.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी उद्या मुंबईत वानखेडे स्टेडिअमवर मुंबई आणि विदर्भ यांच्यात अंतिम सामन्याला सुरुवात होईल. सकाळी साडेनऊ वाजता हा सामना सुरु होईल. या स्पर्धेत तब्बल ५३ वर्षांनंतर पहिल्यांदाच एकाच राज्यातले दोन संघ अंतिम फेरीत पोहोचले आहेत. उपांत्य फेरीतल्या सामन्यात मुंबईनं तामीळनाडूचा पराभव करुन ४८व्यांदा अंतिम फेरी गाठली. तर विदर्भानं मध्यप्रदेशाचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.  मुंबईनं आत्तापर्यंत एकूण ४१ वेळा विजेतेपद पटकावलं आहे, मात्र गेल्या आठ वर्षांपासून ते ४२व्या विजेतेपदाच्या प्रतिक्षेत आहेत. विदर्भानं आत्तापर्यंत दोन वेळा रणजीचं विजेतेपद पटकावलं आहे.

**<><><><><>**

बंगळुरू इथल्या रामेश्वरम कॅफेत झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातला संशयित आरोपी पुण्यात आला असल्याची शक्यता राष्ट्रीय तपास यंत्रणेनं व्यक्त केली आहे. १ मार्चला हा बॉम्बस्फोट झाला होता. त्यानंतर केलेल्या तपासातून हा संशयीत बसनं कर्नाटकात बल्लारीपर्यंत, आणि त्यानंतर भटकल, गोकर्ण, बेळगाव, कोल्हापूरमार्गे पुण्यात पोहोचल्याची शक्यता असल्याचं तपास यंत्रणेनं म्हटलं आहे. या संशयिताबद्दलची माहिती देणाऱ्याला तपास यंत्रणेनं १० लाख रुपयांचं बक्षीसही जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या साकी नाका इथल्या बहुउद्देशीय प्रदर्शन-कम-कन्व्हेन्शन सेंटरची पायाभरणी केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्री नारायण राणे यांच्या हस्ते करण्यात आली. हे केंद्र देशाच्या आर्थिक राजधानीत उभारलं जात असल्यानं या वास्तुचा दर्जाही उत्तम असायला हवा असं ते म्हणाले. देशातल्या उद्योगधंद्यांची प्रगती मुंबईमुळेच झाली, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या माध्यमातून मुंबईची उलाढाल हजारो कोटींपर्यंत पोहोचली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. यावेळी राणे यांनी बहुउद्देशीय प्रदर्शनालाही भेट दिली, तसंच पुणे एमएसएमई विकास आणि सुविधा कार्यालयाचंही उद्घाटनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

सायप्रस ते गाझापर्यंत मदत वाहतूक करण्यासाठी सागरी कॉरिडॉर तयार करण्याच्या प्रयत्नांना गती दिली जाईल, अशी घोषणा युरोपियन युनियननं केली आहे. एक प्रारंभिक पायलट ऑपरेशन काल सुरू करण्यात आल्याचं युरोपियन कमिशनच्या प्रमुख उर्सुला वॉन डर लेन यांनी सांगितलं. संयुक्त अरब अमिरातीनंही

गाझामधल्या लोकांसाठीच्या मालवाहू जहाजांसाठीचा  कॉरिडॉर सक्रिय करण्यात मदत केली होती,असंही त्यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**